# अवैध तिहेरी तलाक ..मुस्लिम पुरूषांना धाक

"तिहेरी तलाक विधेयक" म्हणजेच "मुस्लिम महिला (विवाह अधिकार संरक्षण) विधेयक २०१९ राज्यसभेने बहुमताने मंजूर केले आणि पुन्हा एकदा चर्चेचा गदारोळ उडाला. त्यामुळेच सरकारने हे विधेयक मंजूर करण्याची गरज, हे विधेयक काय आहे आणि त्याला होणारा विरोध कशासाठी हे सर्वच प्रश्न विचारात घेण्याची गरज आहे.

अल्पसंख्यांक आणि त्यातही महिला यांच्यासाठी कोणताही कायदा झाला की सरकारच्या हस्तक्षेपाची चर्चा सुरू होते. पण एक बाब विचारात घेतली पाहिजे की जेव्हा जेव्हा कुठल्याही कायद्याने, कृतीने सर्वसाधारण लोकांच्या हक्कांना बाधा पोचते, त्यांच्यावर अन्याय होतो आणि सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून त्यावर उपाय केले जात नाहीत त्या त्या वेळी सरकारी हस्तक्षेप अनिवार्य ठरतो आणि तेच ह्या विधेयकाबाबत झाले आहे.

मुस्लिम समाजात तीन प्रकारचे तलाक आहेत -१) एहसान, २) हसन आणि तलाक-ए-बिद्दत! यातील पहिले दोन तलाक हे रद्द करण्याजोगे (revocable) तर तलाक-ए-बिद्दत रद्द न करण्याजोगा (irrevocable) आहे. तिहेरी तलाक तोंडी, ईलेक्ट्रोनिक माध्यमाद्वारे, पत्राद्वारे सहजतेने दिला जाई. हा तलाक इन्स्टंट तलाक किंवा तात्काळ घटस्फोट म्हणूनच परिचित आहे. म्हणूनच या तिहेरी तलाकमुळे मुस्लिम महिला सदैव कधी तलाक देऊन घराबाहेर काढले जाईल ह्या दहशतीखालीच वावरत असत. गेल्या कित्येक वर्षात अनेक सुधारणा झाल्या तरी मुस्लिम समाजाकडून पुरुषी वर्चस्वामुळे ह्या तिहेरी तलाकबाबत कोणतीही सुधारणा केली गेली नाही आणि मुस्लिम महिलांच्या मोठ्या गटावर प्रचंड अन्याय होत राहिला. म्हणूनच सरकारला ह्यात हस्तक्षेप करणे भाग पडले. सर्वोच्च न्यायालयाने शायरा बानो केसमध्ये पुरोगामी निकाल देत इन्स्टंट तिहेरी तलाक असंवैधानिक (unconstitutional) ठरवला आणि एक पाऊल पुढे टाकले. शायरा बानोला तिच्या नवऱ्याने १५ वर्षांनंतर एका पत्राद्वारे तिहेरी तलाक देऊन सोडून दिले आणि तिला न्यायालयाचे दरवाजे खट्खटावे लागले. या संदर्भात कोणत्याही पुरुषाने कधी याचिका केली नाही म्हणजेच या विषयावर मुस्लिम समाजात कोणतेही विचार मंथन होत असल्याचे आणि कारवाई करत असल्याचे दिसले नाही. त्यामुळेच मुस्लिम स्त्रियांसाठी समानता, लैंगिक समानता (gender equality) आणि

सन्मान यासाठी सरकारने हस्तक्षेप करत तिहेरी तलाक विधेयक पास केले आहे. आता ह्यावर राष्ट्रपतींची मोहोर उठवणे आणि सरकारतर्फे गॅझेटमध्ये तसे जाहीर करणे एव्हढीच औपचारिकता राहिली आहे.

हे विधेयक आमच्या खाजगी कायद्यांमध्ये (पर्सनल लॉ) हस्तक्षेप आहे अशी ओरडही होत असली तरी हे लक्षात घ्यायला हवे की कोणताही खाजगी कायदा, तरतूद, नियम जर सर्वसामान्यांवर अन्याय करत असतील तर ते त्या त्या समाजानेच बदलायला हवेत अन्यथा त्यात सरकारी हस्तक्षेप अपरिहार्य आहे. ईथे हे ही नमूद करणे आवश्यक आहे की संविधांनामध्ये दिलेल्या समानता, सन्मानाने जगण्याचा अधिकार अशा अनेक अधिकारांशी सुसंगत असे कायदे करण्यास सरकार बांधील तर आहेच पण स्त्रियांसंदर्भात आपण CEDAW या आपण स्वीकारलेल्या आंतरराष्ट्रीय करारानुसारही स्त्रियांमधील असमानता दूर करण्यासाठीही बांधील आहोत. हा कायदा त्यादृष्टीने टाकलेले एक पाऊलच आहे. शिवाय हा कायदा करणारा भारत हा काही पहिला देश नाही तर मुस्लिमधर्मीय किंवा मुस्लिम बहुल अश्या पाकिस्तान, इजिप्त, ट्यूनिशिया, श्रीलंका, बांग्लादेश, तुर्क, इंडोनेशिया आणि इराक या राष्ट्रांमध्येही तिहेरी तलाकला बंदी असून तिथे आमच्या खाजगी कायद्यात ढवळाढवळ होते आहे हे म्हणणे मान्य झालेले नाही हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

मुस्लिम महिला (विवाह अधिकार संरक्षण ) विधेयक २०१९ हे नक्की काय आहे आणि त्याला अनेकांचा विरोध का आहे हे ही समजून घेणे गरजेचे आहे. या विधेयकानुसार एखाद्या पुरुषाने आपल्या पत्नीला तिहेरी तलाक दिला तर ती स्त्री किंवा तिचे रक्ताचे नातेवाईक अथवा लग्नानंतरचे नातेवाईक तिच्या संमतीने पोलिस ठाण्यात तक्रार (प्रथम खबरी अहवाल) नोंदवू शकतात. म्हणजेच तिहेरी तलाक हा आता फौजदारी गुन्हा असून हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. आरोपीला जामीन दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयातून आरोपी आणि पीडित स्त्रीची बाजू ऐकल्यानंतरच मिळू शकतो. तसेच हा गुन्हा compoundable म्हणजेच आपापसात समझौता करून मिटवता येणारा असून त्यासाठीच्या अटीशर्ती माननीय दंडाधिकाऱ्यांनी ठरवण्याची तरतूद आहे. हा गुन्हा सिद्ध झाल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाची आणि दंडाची तरतूद आहे. पीडित स्त्रीला आरोपी पतीकडून स्वत:साठी आणि मुलांसाठी भत्ता मागण्याचा मागण्याचा

तसेच मुलांचा ताबा मागण्याचा अधिकार आहे मात्र भत्त्याची रक्कम तसेच ताबा देण्याची पद्धत दंडाधिकारी ठरवतील.  फौजदारी गुन्हा आणि तुरुंगवासाची शिक्षा यामुळेच ह्या कायद्याला जास्त विरोध होत असून नेहमीप्रमाणेच त्याचा गैरवापर होण्याची भीती दाखवायला सुरुवात झाली आहे.  अर्थात लग्न, घटस्फोट ह्या दिवाणी किंवा नागरी स्वरुपाच्या बाबी असून "नागरी किंवा दिवाणी चुका" ह्या प्रकारात मोडतात. त्यामुळे हा गुन्हा फौजदारी असावा का ही बाब विचार करण्याजोगी नक्कीच आहे. त्याचबरोबर आणखी एक गोष्टीचा विचार व्हायला हवा ती म्हणजे कोणत्याही धर्माच्या स्त्रियांना कायद्यानुसार दिलेली पोटगी, भत्ता, नुकसानभरपाई सर्वसाधारणपणे मिळणे देखील दुरापास्त असते. असे असताना दंडाधिकाऱ्यांनी पीडित स्त्री व तिच्या मुलांना  भत्ता देण्याचा आदेश दिला तरी नवरा जर तुरुंगात गेला किंवा जाणार असेल तर तो आदेश अमलात कसा येणार हा एक वेगळाच प्रश्न आहे आणि त्याच्यावरही  चर्चा होणे अगत्याचे आहे. मुस्लिम महिला आणि ईतर अनेक गट तिहेरी तलाकच्या विरोधात आहेत तसेच ह्या कायद्यातील गुन्हेगारी तरतुदींच्याही  विरोधात आहेत कारण त्यांना नवऱ्याला तुरुंगात टाकण्यापेक्षा त्यांचे वैवाहिक अधिकार जपण्यात जास्त रस आहे.  तसेच मुस्लिम महिलाना तलाक हवा असेल तर काय तरतुदी असाव्यात याचाही विचार व्हायला हवा जो या कायद्यात दिसत नाही. कारण त्यांना लवकर घटस्फोट हवा असेल तर "खुला" (तलाक) घेऊन सर्व हक्कांवर पाणी सोडावे लागते.

हा पुरोगामी कायदा करून समानतेच्या वाटेवर आपण एक पाऊल पुढे टाकलेले आहे आणि त्यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीमधील पुरुषांच्या मनात भीती निर्माण झाली आहे ह्यात शंकाच नाही. पण त्याचवेळी या कायद्याची योग्य पद्धतीने व त्वरित अम्मलबजावणी होण्याकडे तितकेच लक्ष देण्याची गरज आहे. तसे झाले तरच ठरेल तिहेरी तलाक ..मुस्लिम पुरूषांना धाक!

......

एडव्होकेट  नयना परदेशी